# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. (०२२) २६४७१२५५ (का.) / २६४७०९१६ (वै.) फॅक्स क्र. (०२२) २६४७३९८०

Email : director@msbte.com Web : www.msbte.com

---

जा.क्र.मरातंशिमं/का-५०/Staff Approval/२०१२/३८९ दिनांक — १८ जानेवारी २०१२

---

**Web Circular**

प्रति,
मंडळाशी संलग्न असलेल्या AICTE Approved
विनाअनुदानित अभियांत्रिकी पदविका संस्था

**विषय: संस्थेतील शिक्षकीय पदांना मंडळाची मान्यता घेणेबाबत**

शैक्षणिक संस्था ह्या शैक्षणिकदृष्ट्या गुणवत्ताधारक असाव्यात असे शासनाचे धोरण आहे. अशा संस्थांमधून शिक्षण घेऊन बाहेर पडणारे पदविकाधारक विद्यार्थ्यांचे त्या त्या विषयांतील तांत्रिक कौशल्यही दर्जेदार असणे आवश्यक आहे. यादृष्टीने संस्थेमध्ये मुलभूत सोयीसुविधा व्यवस्थित असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संस्थेमध्ये असणारा शिक्षक वर्ग हा पात्र व विहित अर्हताधारक असणे आवश्यक आहे. अर्हता व अनुभव शासनाने तसेच AICTE ने विहित केलेले आहेत.

त्याअनुषंगाने अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या आणि मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व विनाअनुदानित AICTE Approved संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेत भरलेली शिक्षकीय पदे किंवा भरण्यात येणारी शिक्षकीय पदे शासनाने तसेच AICTE ने विहित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार भरणे आवश्यक आहे. तसेच सदरहू नियुक्त्या विहित पध्दतीने करुन त्यांना मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

शासनाने शिक्षकीय नियुक्त्यांना मंजूरी देण्याची जबाबदारी मंडळावर सोपविली आहे. त्यासाठी मंडळाने विहित पध्दती निश्चित केली आहे.

तरी सर्व संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी आपणाकडे असलेल्या जुन्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती नियमित झाली नसल्यास नियमित करुन घेण्यासाठी मंडळाशी संपर्क साधावा. तसेच नवीन पदे भरावयाची असल्यास विहित पध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या नियुक्तीस मान्यता घ्यावी. संस्थेमध्ये मान्यताप्राप्त शिक्षक नसल्यास भविष्यात संस्थेची संलग्नता रद्द होऊ शकेल, याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

**( डॉ. प्र. म. खोडके )**
संचालक,
म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी रवाना :-

१) सचिव, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

२) उपसचिव, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे/औरंगाबाद/नागपूर आणि प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग. त्यांनी सदर परिपत्रक विभागातील सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणावे.